<u>केंद्र पुरस्कृत योजना सन २०२६-२७</u>
“व्याघ्र प्रकल्प” या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत सर्वसाधारण घटकांतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०७.२६/प्र. क्र. २७०/फ-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : १३.०८.२०२६.

<u>वाचा :-</u>

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६.
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६.
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्युएलपी ०४.२६/प्र.क्र. १३५/फ-१, दिनांक १९.०६.२०२६.
४. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. ४-१ (५८)/२०२४-पीटी व इ., (Computer No-२३९०२६), दिनांक ०३.०७.२०२६.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-१/सी/यो/प्र.क्र. १/१०९/२०२६-२७, दिनांक २२.०७.२०२६.

<u>प्रस्तावना :-</u>

केंद्र शासनाने सन २०२६-२७ करीता “व्याघ्र व हत्ती प्रकल्प” या केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत दिनांक ०३.०७.२०२६ रोजीच्या पत्रान्वये पेंच, मेळघाट, बोर, नवेगाव-नागझिरा, सह्याद्री व ताडोबा-अंधारी या ६ व्याघ्र प्रकल्पांच्या विकासात्मक कामांकरीता सर्वसाधारण घटक, अनुसुचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्र उपयोजनाअंतर्गत रु. ३१९३.१६४२८ लक्ष रक्कमेचा वार्षिक प्रर्वतन अहवाल मंजूर केला आहे.

२. त्यानुसार केंद्र शासनाने रु. ८४५.९६ प्रथम हप्ता मंजूर केला असून त्या अनुरुप राज्य हिस्सा रु. ७५०.६२४६ लक्ष असा एकूण रु. १५९६.५८४६० लक्ष निधी वितरीत करणे अपेक्षित आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

सदर शासन निर्णयान्वये “व्याघ्र व हत्ती प्रकल्प” या केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत दिनांक ०३.०७.२०२६ रोजीच्या पत्रान्वये पेंच, मेळघाट, बोर, नवेगाव-नागझिरा, सह्याद्री व ताडोबा-अंधारी या ६ व्याघ्र प्रकल्पांच्या विकासात्मक कामांकरीता फक्त सर्वसाधारण घटकांतर्गत केंद्र हिस्स्यांतर्गत रु. ६७६.७६ लक्ष व त्या अनुरुप राज्य हिस्स्यांतर्गत रु. ६००.४९४ लक्ष असे एकूण रु. १२७७.२५४ लक्ष निधी खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

व्याघ्र प्रकल्प या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत व्याघ्र प्रकल्प या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत पेंच, मेळघाट, बोर, नवेगाव-नागझिरा, सह्याद्री व ताडोबा-अंधारी या ६ व्याघ्र प्रकल्पाच्या विकासात्मक कामांसाठी होणारा खर्च **I)** अनावर्ती बाबींसाठी केंद्र हिस्सा ६०% करीता रु. २२८.८० लक्ष क्र. २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवनाचे संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, केंद्र पुरस्कृत योजना (००)(०४) व्याघ्र प्रकल्प (६० % केंद्रीय अनुदान) (२४०६ १२४३) **II)** त्या अनुरुप राज्य शासनाचा राज्य हिस्सा ४० % करीता रु. १५२.५३४ लक्ष लेखाशिर्ष क्र. २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवनाचे संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजना (००)(२१) व्याघ्र प्रकल्प (४० % राज्य हिस्सा) (२४०६ ए१०२) **III)** आवर्ती बाबींसाठी रु. ४४७.९६ लक्ष लेखाशिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवनाचे संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, केंद्र पुरस्कृत योजना (००)(२३) व्याघ्र प्रकल्प (५० % केंद्रीय अनुदान) (२४०६ ए१२२) **IV)** त्या अनुरुप ५० % राज्य हिस्सा रु. ४४७.९६ लक्ष लेखाशिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवनाचे संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजना (००)(२४) व्याघ्र प्रकल्प (५० % राज्य हिस्सा) (२४०६ ए१३१) या लेखाशिर्षांतर्गत सन २०२६-२७ मध्ये अर्थसंकल्पित वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणा-या अनुदानातून खर्च करण्यात यावा.

अ) सदर शासन निर्णयान्वये वितरीत केलेला निधी **<u>३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)</u>** या उदिष्टांतर्गत उपल्बध असलेल्या निधीचा विनीयोग करण्यात यावा. तसेच संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये विशेष व्याघ्र संरक्षण दलात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी वितरीत करण्यात आलेला निधी विहीत कार्यपध्दीतीनुसार शासनास परत करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

आ) सदर शासन निर्णयान्वये वितरीत केलेला निधी SNA-SPARSH प्रणालीद्वारे खर्च करण्यात यावा. त्याकरीता ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या उदिष्टांतर्गत उपलब्ध असलेल्या निधीचा विनियोग करण्यात यावा.

इ) सदर शासन निर्णयान्वये वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने संदर्भीय पत्रान्वये मान्यता दिलेल्या तपशीलवार कार्यबाबींवर व सदर कामांना सक्षम प्राधिका-याची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता असल्याखेरीज रक्कम खर्ची टाकण्यात येऊ नये.

ई) वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेत विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच केंद्र शासनाने प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

उ) प्रस्तावित असलेल्या मोठया बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची जबाबदारी संबंधीत नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील.

ऊ) वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ व वित्त विभाग परिपत्रक, क्रमांक : अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६ चे काटेकोर पालन करावे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ व वित्त विभाग परिपत्रक, क्रमांक : अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे असे नमूद करणे अपेक्षित होते.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१३१५०३१८११४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIDHAR VIKRAM DESHMUKH

Digitally signed by SHRIDHAR VIKRAM DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department,
2.5.4.20=D3DD41251A6E229D40D43D90520B8D2A921AE59C8013644628B65C38D28868D8, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=912CC46938BC6D9CF9A14E38D8B09ED7F8FD6E5EE2A4A245C1C55A32E6315D48, cn=SHRIDHAR VIKRAM DESHMUKH
Date: 2026.08.13 15:04:07 +05'30'

(श्रीधर देशमुख)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व, नागपूर / पश्चिम, मुंबई.
५. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच-बोर व्याघ्र प्रकल्प, नागपूर.
६. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.
७. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
८. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर.
९. उप वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया.
१०. कोषागार अधिकारी, नागपूर.
११. महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षण /लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१२. फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती)

****